Aarhat Publication & Aarhat Journal's

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Research Journal

ISSN- 2277-8721

Online and Print Journal

**Impact Factor: 5.20 (EduIndex)**

**UGC Approved Journal No - 48833**

**10th March, 2018**

**Vol VII Issues No X**

**Chief Editor**

Ubale Amol Baban

**Chief Editor**

Prin. Dr. Purandhar Dhanpal Nare

PRINCIPAL,
Shri Venkatesh Mahavidyalaya,
ICHALKARANJI - 416 115

## INDEX


| Sr.No. | Author Name | Title | Page No |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.भगवान जाधव | उच्च्च शिक्षा में हिंदी का पाठ्यक्रम:एक अनुशीलन | 1 |
| 2 | डॉ.एम.आर.मुंडकर | देवेश ठाकुर के उपन्यासों में चित्रित उच्च शिक्षा व्यवस्था का यथार्थ ('गुरुकुल' और 'शिखर पुरुष' उपन्यासों के सन्दर्भ में ) | 5 |
| 3 | डॉ.एकनाथ पाटील | मराठी के बारोमास उपन्यास में उच्च शिक्षित युवाओं की भयावहता | 9 |
| 4 | डॉ. प्रकाश मुंज | बीसवी सदी के अंतिम दशक की हिंदी कहानी में उच्च शिक्षा | 14 |
| 5 | प्रा.संतोष साळुंखे | 'आठवे दशक के उपन्यासों में चित्रित उच्च शिक्षा व्यवस्था का वास्तव'('चक्रव्यूह' और 'सुनी घाटी का सूरज' के विशेष संदर्भ में) | 21 |
| 6 | डॉ.सहदेव वर्षाराणी निवृत्तीराव | भूमण्डलीकरण और आज की कविता | 24 |
| 7 | डॉ आर. बी .भूयेकर | बीसवी सदी के अंतिम दशक के उपन्यासों में उच्च शिक्षित बेरोजगार युवा | 29 |
| 8 | अतुल आनंदराव देसाई | महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ | 33 |
| 9 | डॉ.वृषाली विकास मिणचेकर | 'विजन'उपन्यास में उच्चशिक्षित स्त्री की स्थिति | 38 |
| 10 | प्रा.पटेल एफ.एन | उच्चशिक्षण आणि मुस्लीम समाज | 42 |
| 11 | डॉ.दीपक कांबळे व डॉ.अरुण जाधव | उच्च शिक्षणासमोरील आव्हान | 45 |
| 12 | डॉ. एस.एम.गावडे | भारतातील उच्च शिक्षणातील समस्या | 48 |
| 13 | Dr. Chetna P.Sonkamble Mr.Vijaykumar Mutnale | Emerging Issues And Challenges In Higher Education | 53 |
| 14 | रीना कांबळे | उच्च शिक्षणातील समाजशास्त्रीय संकल्पनाच्या अभ्यासाची गरज :एक चिकीस्ता | 55 |
| 15 | प्रा.वनिता शिंदे | उच्च शिक्षणातील मराठी भाषेचे महत्व | 59 |
| 16 | प्रा.संजय पाटील | हिंदी भाषा और साहित्य के संदर्भ में | 66 |

# उच्च शिक्षणासमोरील आव्हाने

डॉ. दिपक सुभाष कांबळे

प्रा. डॉ. अरूण योगेश्वर जाधव
*सहाय्यक प्राध्यापक,*
*र. भा. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड*

**प्रस्तावना :**

विसावे शतक हे ज्ञान–विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञानाचे, जागतिकीकरणामुळे प्रचंड चंगळवादी, स्पर्धा सामर्थ्याचे, पर्यावरणाच्या विनाशाचे, महायुद्धांचे, स्वातंत्र्य चळवळीचे, राज्यक्रांतीचे म्हणून गणले गेले. अर्थशास्त्रीय सिद्धांत देखील कारणे परिणामांच्या शोधात राहिले. शस्त्रांत्रांच्या सामर्थ्यावर देशांची शक्ती मोजली जावू लागली. तेव्हा शिक्षण प्रगती करीत आहे की शिक्षण व्यवस्था पराभूत होत आहे? हा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी १९४९ साली केलेल्या भाषणात 'विद्यापीठ' संकल्पनेला नेमके काय अभिप्रेत आहे हे स्पष्ट केले आहे. मानवतावाद सहिष्णू वृत्ती, विवेक आणि बुद्धिनिष्ठा, मानवाची प्रगती तसेच नवे विचार आणि कल्पनांचे साहजी सृजन वृद्धींगत व्हायला पोषक वातावरण तयार करणे आणि सत्याचा शोध व ध्यास घेणे हे विद्यापीठांचे खरे प्रयोजन आहे. मानव समाजाला अशा उच्च दर्जाच्या उद्दिष्टांकडे वाटचाल करावयाची असेल तर विद्यापीठांनी आपले कार्य देशाभिमुख आणि लोकाभिमुख केले पाहिजे. अशा विद्येच्या मंदिरात संकुचित वृत्ती आणि हीन दर्जाचे हितसंबंध जपणाऱ्यांना थारा नसला पाहिजे. तरच राष्ट्र समृद्ध होईल आणि जनतेचा विकास साधला जाईल.

डॉ. राधाकृष्ण आयोगाच्या मते, 'उत्कृष्ठ दर्जाचे अध्ययन अध्यापन आणि संशोधनासाठी तळमळ व निष्ठा असणाऱ्या विद्वानांना आपला ध्यास तडीस नेण्याची मुभा असली पाहिजे. त्यासाठी विद्यापीठांना स्वायत्ता असली पाहिजे.' यावरून उच्च शिक्षणात विद्यापीठांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट होते.

स्वातंत्र्यानंतर भारतात उच्च शिक्षणाची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ निश्चित झाली आहे. तरी सुद्धा जागतिक पातळीवर उच्च शिक्षण आपला ठसा उमटवू शकले नाही. हे ही वास्तव नाकारता येत नाही तेव्हा उच्च शिक्षणासमोरील आव्हाने अभ्यासणे अनिवार्य ठरते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१) उच्च शिक्षणातील वास्तव परिस्थिती अभ्यासणे.

२) उच्च शिक्षणातील आव्हाने अभ्यासणे.

**उच्च शिक्षणातील वास्तव परिस्थिती :**

भारतात प्राचीन काळी नालंदा, लक्षशिला विद्यापीठे होती. परंतु उच्च शिक्षण देणारी स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना १८५७ साली झाली. स्वातंत्र्यानंतर युजीसी ची स्थापना करून उच्च शिक्षणाला गती देण्याचे काम झाले. शिक्षणातील बदलते प्रवाह, काळाजी गरज ओळखून विविध समित्या, आयोग नेमण्यात आले, कोठारी आयोग, राधाकृष्णन आयोग इ. आयोगातून उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सध्या जगातील तीन नंबरची शिक्षण व्यवस्था म्हणून आपल्या शिक्षण व्यवस्थेकडे पाहिले जाते. सध्या भारतात ९७० विद्यापीं कार्यरत असून कला, क्रीडा, सांस्कृतिक, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी क्षेत्रातील गरज ओळखून विद्यापीठे, महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. त्यामुळे देशाच्या विकासाला हातभार लागला.

जागतिकीकरणानंतर संपूर्ण जग एक बाजारपेठ बनली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या उत्तुंग भरारीमुळे अंतराळ आणि भूमी यातील संवाद वाढला आहे. प्रत्येक वस्तू व सेवेची निर्मिती बाजारातील गरज ओळखून केली जात आहे. या सर्वांचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर देखील झाला आहे. त्यामुळे उच्च शिक्षण देखील ध्येयवादाकडून बाजारवादाकडे वळले आहे. त्यामुळे मानवतावाद नैतिक मूल्ये आणि शिक्षण व्यवस्था यासमोर आव्हाने निर्माण झालेली आहे.

**शिक्षण व्यवस्थेतील आव्हाने :**

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेतील आव्हाने ही शिक्षण क्षेत्रातील विचारवंत, कुलगुरू, सामाजिक क्षेत्रातील विचारवंत, राजकारणी इ. नी वेळोवेळी नमूद केलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) विद्यार्थी गळतीचे प्रमाण अधिक :**

भारतातील शिक्षण व्यवस्थेतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे विद्यार्थी गळती होय. माजी मनुष्यबळ विकास मंत्री कपिल सिब्बल यांच्या मते, पहिली इयत्तेत प्रवेश घेतलेल्या १०० विद्यार्थ्यांपैकी पाचवी मध्ये ४८ विद्यार्थी राहतात म्हणजे ५२ टक्के गळती होते. त्यापैकी पदवीपर्यंत उच्च शिक्षण फक्त ६

टक्के विद्यार्थी घेतात. विद्यार्थी गळती ९४ टक्के होते. ही गळती कमी करण्याचे आव्हान शिक्षण व्यवस्थेसमोर आहे. सध्या २० टक्के विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात हे प्रमाण २५ टक्के पर्यंत वाढविण्याचे आव्हान आहे. त्यासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांची संख्या वाढविली पाहिजे.

**२) कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम :**

शिक्षण क्षेत्रातील विचारवंताच्या मते, २१ व्या शतकात आशयाधिष्ठीत शिक्षक केंद्रीत शिक्षण योग्य नाही. विद्यार्थी केंद्रित, अध्ययन केंद्रीत शिक्षण पाहिजे. विद्यार्थ्यांना पारंपारित अभ्यासक्रमामध्ये रूची राहिलेली नाही. त्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज वाढते. ताबडतोब पैसा मिळवून स्वावलंबी **होता येईल असे कौशल्याबर आधारीत शिक्षण हवे आहे. परंतु पारंपारीक शिक्षणाबरोबरच कौशल्य अभ्यासक्रमाचे महत्त्व मांडण्यात उच्च शिक्षण** व्यवस्थेला अपयश येत आहे. त्यामुळे विद्यापीठे ही बेकारांची फौज तयार करणारे कारखाने बनले आहेत असे उद्वेगाने म्हटले जाते.

**३) खाजगी शिक्षण संस्थांचे प्राबल्य :**

जागतिकिकरणानंतर इंग्रजी माध्यमाच्या शाळा, खाजगी कोचींग क्लासेस यांचे पेव फुटले आहे. खाजगी शाळा, महाविद्यालये ग्रामीण भागातही प्रचंड फी आकारून मॉडर्न शिक्षणाची सोय केलेली आहे. अशा शाळा, महाविद्यालयांमध्येच आपल्या पाल्याचे भवितव्य आहे असा समज पालक व खुद्द विद्यार्थ्यांचा झाला आहे. सरकारी शाळा, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांअभावी ओस पडत आहेत. त्यामुळे सरकार काही शाळा बंद करण्याचा विचार करीत आहे. पुढे त्याचा परिणाम अनुदानित महाविद्यालये बंद पडतील. गरीब विद्यार्थ्यांना पुन्हा उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागेल. गरीबांसाठी Free Education, Cheap Education and Education for Social Justice ही केवळ घोषणा ठरली आहे. त्यामुळे सर्वांसाठी उच्चशिक्षण देता येत नाही हे खरे आव्हान आहे.

**४) खाजगीकरण आणि विदेशी विद्यापीठांचा प्रवेश :**

आज भारतात खाजगीकरणाने तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था, अभिमत विद्यापीठे अस्तित्वात आली आहेत. भारतातील ब्रेन ड्रेन रोखण्यासाठी विदेशी विद्यापीठांना ही प्रवेश दिलेला आहे. त्यामुळे स्पर्धा वाढून भारताचा विकास होईल असे सांगितले जाते. परंतु त्यामुळे शिक्षणाचे पाश्चिमात्यकरण होण्याचा धोका आहे.

म. गांधीनी १४ ऑगस्ट १९४७ रोजी बी. बी. सी. ला मुलाखत देताना इंग्रजी शिक्षण पद्धती बदलली पाहिजे. राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करणारी स्वदेशी शिक्षण पद्धती अवलंबिली पाहिजे असे मत मांडले होते. विदेशी विद्यापीठातून राष्ट्रहित, राष्ट्रप्रेम, संस्कार, सामाजिक बांधिलकी शिकविली जाणार नाही त्यामुळे शिक्षणाचा मूळ हेतूच बाजूला फेकला जाईल. तेव्हा विदेशी विद्यापीठांबरोबर स्पर्धा निर्माण करणारी गांधीजींचा मानवतावाद मांडणारी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचे आव्हान आहे.

**५) प्रादेशिक सामाजिक व आर्थिक विषमता :**

भारत हा खंडप्राय देश आहे. येथे भाषा, प्रांत, धर्म, जाती व्यवस्था, गरीब, श्रीमंत यामध्ये प्रचंड भेदाभेद आहे. उच्च शिक्षणातून आपल्याला प्रादेशिक, सामाजिक व आर्थिक समानता निर्माण करावयाची आहे. मात्र हे शिक्षण व्यवस्थेला साध्य करता आलेले नाही. उलट शिक्षणाने भीषण विषमता निर्माण केलेली आहे. श्रीमंतासाठी शाळा, महाविद्यालये, गरीबांसाठी गरीब शाळा महाविद्यालये, अति श्रीमंतासाठी पब्लिक स्कूल, इंटरनॅशनल निवा… कॉलेजीस आहेत. प्रचंड डोनेशन देऊन उच्च वर्ग, मध्यम वर्ग यामध्ये प्रवेश घेण्यासाठी स्पर्धा करीत आहे. तर दुसरीकडे गरीब विद्यार्थ्यांना बसच्या पासला पैसे मिळत नाहीत म्हणून आत्महत्या होतात. गरीबांच्याकडे कॉलेजजची फी, परीक्षा फी भरण्याइतके पैसे नाहीत. तेव्हा भीषण विषमतेत सर्वांना समान शिक्षण कसे देणार?

अजूनही आदीवासी, वनवासी, अनुसूचित जाती, भटके व विमुक्त जाती आणि जमाती मध्ये शिक्षणाबाबत रूची निर्माण झालेली नाही. काही शिकलेत ती पहिली पिढी आहे. तेव्हा सामाजिक विषमता मोठी आहे ती कमी करण्याचे आव्हान आहे. शिक्षणाने स्पर्धा शक्ती वाढते हे खरे आहे पण या विषमता परिस्थितीत स्पर्धा कशी वाढवावयाची हाच प्रश्न आहे.

**६) संशोधन / नवउपक्रम शिलतेचे आव्हान :**

विद्यापीठ पातळीवर एम. फिल. आणि पीएच.डी. मधून संशोधन केले जाते. अलिकडे सेमीनार, परिसंवाद हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे आयोजित केले जातात त्यामध्ये शोधनिबंध सादर केले जातात. संशोधन जनरल मधून त्यांना प्रसिद्ध केले जाते. यामध्ये खरोखरच संशोधन आहे का? सेमीनारच्या विषयामध्ये सखोल संशोधन करून शोधनिबंध मांडले जातात का? हे आंतर्मुख होऊन पाहिल्यास शोधनिबंध सादर होतात ते एपीआय वाढविण्यासाठी प्रत्यक्ष त्याचा उपयोग फारसा होत नाही. आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ठ दर्जा आमचे संशोधन करू शकलेले नाही. तेव्हा नव संशोधक तयार करून येथील प्रश्न सोडविणाऱ्या संशोधनाला चालना देण्याचे आव्हान आहे.